# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः03.04.2025** **वारःगुरुवार**

---

**ठळक बातम्या**

• लोकसभेत वक्फ (सुधारणा) विधेयक मंजूर; वक्फ मंडळांना सर्वसमावेशक बनविण्याचा उद्देश असल्याचं सरकारचं प्रतिपादन; तर हे विधेयक दिशाभूल करणारं असल्याची विरोधकांची टिका.
• मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवटीला घटनात्मक मान्यतेबाबत लोकसभेत ठराव मंजूर.
• दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी थायलंडला रवाना.
• भारतासह विविध देशांमधून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर प्रत्युत्तर करांची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा. भारतातून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर २६ टक्के कर.
• आणि
• महाराष्ट्रासह ओडिशा, पश्चिम बंगाल आणि झारखंडमध्ये पुढचे दोन-तीन दिवस हलक्या ते मध्यम पावसाचा हवामान विभागाचा अंदाज.

**वक्फ-पूल**

लोकसभेत काल रात्री उशिरा वक्फ सुधारणा विधेयक 2025 मंजूर करण्यात आलं. विधेयकाच्या बाजूनं 288 सदस्यांनी मतदान केलं, तर 232 सदस्यांनी विरोधात मतदान केलं. रात्री उशिरापर्यंत विधेयकावर चर्चा झाल्यानंतर मतदान घेण्यात आलं.
वक्फच्या मालमत्तांच्या व्यवस्थापनाच्या सुसूत्रीकरण करण्याबरोबरच वारसास्थळांची सुरक्षा आणि सामाजिक कल्याणाला प्रोत्साहन देणं हा वक्फ सुधारणा विधेयक 2025 चा उद्दश आहे.
मालममत्तांच्या व्यवस्थापनामध्ये पारदर्शकता वाढवणं, वक्फ मंडळं आणि स्थानिक अधिकारी यांच्यामध्ये समन्वय वाढवणं आणि सर्व संबंधितांच्या हक्कांचं रक्षण करणं यावरही या विधेयकात भर आहे. वक्फ मंडळांना अधिक सर्वसमावेशक बनवणं, वक्फच्या सुशासनासाठी आणि निर्णयांसाठी मुस्लिम समाजातील सर्व पंथांना प्रतिनिधीत्व देणं हा विधेयकाचा उद्देश आहे. यापूर्वी, संयुक्त संसदीय समितीनं अहवाल दिल्यानुसार लोकसभेत वक्फ (सुधारणा) विधेयकावर चर्चा झाली. भारत हा अल्पसंख्याक समुदासाठी सर्वांत सुरक्षित देश आहे, असं केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन

रिजिजू यांनी विधेयक मांडताना सांगितलं.  सरकार अल्पसंख्याकविरोधी असल्याचा आरोप त्यांनी फेटाळून लावला. या विधेयकाचा मुस्लिमांच्या धार्मिक प्रथांशी काहीही संबंध नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. ते म्हणाले.

**गवर्मेंट किसी भी धार्मिक व्यवस्था को, किसी भी रिलीजियस इंस्टीट्यूशन कोई धार्मिक काम में हस्तक्षेप करने नहीं जा रही है, ना ही वक्फ बोर्ड किसी धार्मिक स्थापित व्यवस्था में कोई भी तरीके से हाथ डालने का प्रावधान है। बिलकुल नहीं है, ये वक्फ बोर्ड का जो प्रावधान किसी मस्जिद, किसी मंदिर, किसी धार्मिक स्थल का व्यवस्था का कोई लेना-देना नहीं है।  ये सिंपली एक प्रॉपटी का मैनेजमेंट का व्यवस्था है।**

किरेन रिजीजू म्हणाले की, या विधेयकानुसार, वक्फ मंडळांमध्ये विविध मुस्लिम पंथांचे आणि महिलांचे प्रतिनिधी असतील. विरोधक विधेयकाबाबत लोकांची दिशाभूल करत असल्याचा आरोप त्यांनी केला. आधीच्या कायद्यात, देशातील कोणत्याही जमिनीला वक्फ मालमत्ता म्हणून घोषित करण्यासाठी काही तरतुदींचा गैरवापर करण्यात आला असल्याचं त्यांनी नमूद केलं. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात 2013 मध्ये वक्फ कायद्यात बदल करण्यात आले. कॉंग्रेस राजवटीत दिल्लीतील 123 मालमत्ता दिल्ली वक्फ मंडळाकडे हस्तांतरित करण्यात आल्या, असाही आरोप त्यांनी केला. विरोधकांना उत्तर देताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, मंत्रिमंडळानं मंजूर केलेल्या संयुक्त संसदीय समितीनं सविस्तर चर्चा केल्यानंतर हे विधेयक आणलं आहे.
वक्फ मंडळांमध्ये कोणतेही मुस्लिमेतर सदस्य नसतील, असं त्यांनी स्पष्ट केलं आणि तसा कोणताही उद्देश नसल्याचं ते म्हणाले. अल्पसंख्याकांमध्ये भीती पसरवण्यासाठी आणि आपली मतं सुरक्षित राखण्यासाठी या विधेयकाबाबत अपप्रचार केला जात आहे, असंही ते म्हणाले .चर्चेला सुरुवात करताना, काँग्रेसचे गौरव गोगोई यांनी सरकारवर या विधेयकावर लोकांची दिशाभूल करण्याचा आरोप केला. ते म्हणाले की, हे विधेयक संविधानाविरुद्ध आहे. या कायद्यातील सुधारणांमुळे अधिक समस्या निर्माण होतील अशी टीका त्यांनी केली. समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव यांनी महागाई, बेरोजगारी, आणि इतर मुद्द्यांशी संबंधित अपयश लपविण्यासाठी सरकारनं हे विधेयक आणलं आहे अशी टिका केली. तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी प्रस्तावित कायदा चुकीचा, तर्कहीन आणि मनमानी असल्याचं म्हटलं. द्रमुकचे ए. राजा यांनी विधेयक घटनाबाह्य असल्याचा आरोप केला. विरोधक राज्यघटनेचे सोयीनं दाखले देत असल्याची टीका भाजपाचे रविशंकर प्रसाद यांनी केली. वक्फच्या अनेक मालमत्ता पडून आहेत आणि चुकीच्या उद्देशानं त्यांचं गैरव्यवस्थापन होत आहे असं टीडीपीचे कृष्णाप्रसाद टेन्नेटी म्हणाले.

**मणिपूर - ठराव**

मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवटीला घटनात्मक मान्यता देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. मणिपूरमध्ये स्थिती पूर्वपदावर येण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी स्पष्ट केलं. या राज्यात शांतता प्रस्थापित होण्याला सरकारचं सर्वोच्च प्राधान्य असल्याचं ते म्हणाले आणि गेल्या चार महिन्यांमध्ये संघर्षामुळे कोणताही मृत्यू झाला नसल्याचं सांगितलं.

**मोदी थायलंड रवाना**

पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी आज सकाळी थायलंडला रवाना झाले. सहाव्या बिमस्टेक शिखर परिषदेत पंतप्रधान सहभागी होणार आहेत. 2016 आणि 2019 नंतरचा पंतप्रधानांचा हा तिसरा दौरा आहे. ते आज संध्याकाळी थायलंडचे पंतप्रधान पेटोंगटार्न शिनावात्रा यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील. या प्रसंगी अनेक द्विपक्षीय करारांवर सह्याही केल्या जाणार आहेत. बिमस्टेक परिषद उद्या होणार असून, बिमस्टेक – संपन्न, लवचिक आणि खुली असं या परिषदेचं ब्रीदवाक्य आहे. या परिषदेनंतर पंतप्रधान मोदी उद्या श्रीलंकेला तीन दिवसांच्या दौऱ्यासाठी रवाना होणार आहेत. त्यांचा हा चौथा श्रीलंका दौरा आहे.

**ट्रम्प दर**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रात्री उशिरा भारतासह विविध देशांमधून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर रेसिप्रोकल टॅक्स म्हणजे प्रत्युत्तर करांची घोषणा केली. भारतातून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर 26 टक्के कर लादण्यात आला आहे. काल रात्री उशिरा झालेल्या पत्रकार परिषदेत ट्रम्प म्हणाले, की हे कर पूर्णपणे रेसिप्रोकल म्हणजे तेवढ्यास तेवढे नसतील. अमेरिकेतून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंसाठी हे देश जितका कर लावतात त्याच्या सुमारे निम्मा कर अमेरिका लावेल. युरोपिय महासंघाकडून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर वीस टक्के तर ब्रिटनमधून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर दहा टक्के इतकाच कर लावण्यात आला आहे. चीनवर 34 टक्के, बांगलादेशवर 37, पाकिस्तानवर 37,श्रीलंकेवर 44, तर इस्राईलवर 17 टक्के आयात कर लावण्यात आला आहे. दरम्यान अनेक देशांनी हे कर न्याय्य नसल्याची टीका केली आहे. कॅनडानं प्रति उपाययोजना केली जाईल असं म्हटलं आहे, तर इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी हे कर चुकीचे असल्याचं म्हटलं आहे. अमेरिकेची करयोजना म्हणजे मित्रासारखी कृती नाही असं ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी म्हटलं आहे, तर ब्रिटननं कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केलेली नाही.

**म्यानमार-शस्त्रसंधी**

म्यानमारमधील भूकंपामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या तीन हजार 3 वर गेली आहे, तर जखमींची संख्या चार हजार पाचशे इतकी झाली आहे. दरम्यान, मदतकार्याला वेग येण्यासाठी देशात सुरू असलेल्या यादवीबाबत हंगामी शस्त्रसंधीची घोषणा त्या देशाच्या सत्तारुढ लष्करानं केली आहे. ही शस्त्रसंधी 22 तारखेपर्यंत सुरू राहील अशी घोषणा तिथल्या लष्करानं केली आहे.

**पथकर शुल्क वाढ**

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं, देशभरातल्या पथकरामध्ये, 4 ते 5 टक्क्यांनी वाढ केली असून, ती तत्काळ लागू झाली आहे. हलक्या वाहनांसाठी 5 ते 10 रुपये तर जड वाहनांसाठी, 20 ते 25 रुपयांनी पथकर वाढणार आहे. कारसाठीचा मासिक पास आता 930 वरून 950 रुपये होणार असून, हे सुधारित दर, देशभरातले राष्ट्रीय महामार्ग तसंच द्रुतगती मार्गांना लागू होणार आहेत.

**आयएसएसएफ**

आंतरराष्ट्रीय नेमबाजी महासंघ म्हणजे आयएसएसएफ करंडक आजपासून अर्जेटिंनातील ब्युनॉस आयर्स इथं सुरू होत आहे. भारताची ऑलिंपिक विजेती नेमबाज मनू भाकर भारताच्या संघाचं नेतृत्व करणार आहे. स्पर्धेत 45 देशांमधील चारशे नेमबाज सहभागी होत आहेत. भारताचे सौरभ चौधरी, अनिश भंवाला यांच्यासह 43 नेमबाज स्पर्धेत सहभागी होत आहेत.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटमध्ये गुजरात टायटन्सनं काल रॉयल चॅलेंजर्सं बंगळुरुचा 8 गडी राखून पराभव केला. गुजरातनं 170 धावांचं लक्ष्य अठराव्या षटकातच सहज पार केलं. तत्पूर्वी आरसीबीनं 8 गडी बाद 169 धावा केल्या.

**पाऊस-अंदाज**

महाराष्ट्रासह ओडिशा, पश्चिम बंगाल आणि झारखंडमध्ये पुढचे दोन-तीन दिवस विजांचा कडकडाट आणि जोरदार वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. तमिळनाडू, पुदुच्चेरी, केरळ आणि उत्तर कर्नाटकात मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सौराष्ट्र आणि कच्छ भागात उष्णतेची लाट कायम राहील असंही हवामान विभागानं म्हटलं आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.**